आर.सी.सी क्र. १८७६/२०१९.
सरकार विरुध्द राजीव ....
**निशाणी क्र. २१/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव – रामपाल भरतु चव्हाण,**
वय – ३८वर्षे, व्यवसाय – मजुरी.
निवासस्थान–गांधीनगर, छ. संभाजीनगर.

---

**<u>सरतपासणी साक्षीदार स्वताः करीता</u>**

**<u>श्री.एम.एस.राऊत, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे शपथेवर सुरू –</u>**

माझे घर गांधीनगर येथे आहे. माझे घर वडीलोपारजीत आहे. या घरात आम्ही चार भाऊ वेग–वेगळे राहतो. माझ्या छोटया भावाकडे तिथेच आई–वडील राहतात. तारिख माल लक्षात नाही पंरतु मे २०१८ ला सकाळी १०.०० वाजता भांडण झाले. मी आणि बबिता घरी होतो. भांडण हे बकरी मुळे झाले. बकरीचे केस माझ्या मुलाच्या तोडात जात होते त्यावरुन वाद झाला. बकरी ही माझ्या मोठया भावाची होती. मोठया भावाचे नाव– राजु भरतु चव्हाण. माझ्या पत्नीने राजु चव्हाण यांना बकरीचे केस मुलाच्या तोडात जातात या वरुन वाद केला त्यावेळेला राजु चव्हाणने माझ्या पत्नीला मारहाण केली व छातीला हात लावला. पत्नीला लाथा बुक्याने मारले. आजुबाजुच्या लोकानी सोडवले. मी त्या वेळेला घरात होतो. मी आवज झाला म्हणुन बाहेर आलो. सर्वानी सोडवले. विशाल रिडलॉन, सोनु ओमप्रमाश चंडालीया, मुकेश सुरेश रिडलॉन, रोहित दुलगज या लोकाणी वाद सोडवला. क्रांतिचौक पोलिस ठाणे येथे जावूण फिर्याद दिली. पोलिसानी माझ्या कडे चौकशी केली त्याप्रमाणे माझे बयाण नोंदवले. आरोपी राजु याला मी ओळखतो तो आज न्यायालयासमोर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपासणी आरोपी पक्षा करीता</u>**

**<u>श्रीमती एस.पी.नगरकर, विद्यीज्ञ यांचे द्वारा –</u>**

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावा मध्ये आणि माझ्या मध्ये घर वाटपावरुन वाद झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी पुर्वी वडलो पार्जीत घराच्या पुर्वेलाच राहत सद्याा पश्चिमेला राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या घरात मी राहतो ते घर मला आरोपीने बॉण्डवर लिहुण दिले. हे म्हणणे खरे नाही की, या पशचिमे कडील घरावरुन आरोपी व माझ्यात वाद चालू आहे. वाद हा माझे घर बॉण्डवर मी आरोपीला दिले व अरोपीचे घर बॉण्डवर त्याने मला दिले यावरुन वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या आजूबाजूला पुक्षकळ घर राहतात तेथे दाट वस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिस ठाण्यात तक्रार देताना मी, माझी पत्नी, माझी मेहवनी असे सर्व नातेवाइक पोलिस ठाणेत गेलो होतो. ४.०० वाजता एक घटना

घटली त्यामध्ये माझे मेहवे वगैरे आले होते. पत्नीने फिर्याद देताना मि एकले. माझ्या मुलाची काही आरोग्य तपासणी बकरीचे केस तोडात गेल्यामुळे उलटया झाल्या या करीता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्यक्ष कोणती घटनाच पाहिली नाही.  हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला मारहाण केली नाही अथवा तिच्या छातीला हात लावले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा प्रत्यक्ष घटनेशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरात वाद असल्यामुळे आरोपी विरुध्द खोटी फिर्याद पत्नी मार्फत दिली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, पत्नीच्या म्हणण्याला बळ देण्या करीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाला होणा–या त्रासाकरिता मी डॉक्टराकडे गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास– पुर्ण.**

**फेर तपास– काही नाही.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
|---|---|
| ( श्री.आर.एस.जांबोटकर ) | ( श्री.आर.एस.जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |
| दिनांक–१६/०९/२०२४. | |